जा.क्र.प्राकृसंके/उद्यान /कं.म./१७७०/२०२३
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र कर्जत,
ता.कर्जत जि. रायगड
दि. ०५.०९.२०२३

प्रति,

मा. संचालक, विस्तार शिक्षण,
डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ,
दापोली, जि. रत्नागिरी.

**विषय: विद्यापीठ संकेतस्थळावर जाहिर प्रसिध्दी करणेबाबत..**

महोदय,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, उद्यानविद्या विभागामध्ये कंत्राटी मजूर भरण्याकरिता दरपत्रक मागविण्यात आले आहेत. तरी सोबत जोडलेले प्रपत्राची विद्यापीठ संकेत स्थळावर प्रसिध्दी करण्यात यावी, हि विनंती.

आपला विश्वासू,

सोबत : वरीलप्रमाणे.

सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड.

# प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
# कर्जत–४१० २०१, जि. रायगड

जा.क्र.ससंसं/उद्यान/क.म./ 1770 /२०२३ दिनांक : 7 SEP 2023

## जाहीर प्रसिध्दी (NOTICE)

प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील उद्यानविद्या विभागातील निव्वळ कंत्राटी पध्दतीने ०१.१०.२०२३ ते ३१.०३.२०२४ या कालावधीत शेतीविषयक विविध कामे करावयाची आहेत. उपरोक्त कामाचा अनुभव असलेल्या आणि काम करण्यास इच्छुक असणाऱ्या कंत्राटदारांनी सोबत जोडलेल्या कामासाठी आपले दरपत्रक या कार्यालयास दि.२५.०९.२०२३ पूर्वी/पर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावे. सोबत कामाच्या अटी व शर्ती आपल्या माहितीसाठी जोडण्यात आलेल्या आहेत.

सहयोगी संशोधन संचालक
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत–४१०२०१ जि. रायगड

प्रत : प्रसिध्दीसाठी

१. नोटीस बोर्ड, प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत, जि. रायगड
२. मा. कार्यकारी अधिकारी, पंचायत समिती/नगर परिषद कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी.
३. मा. तहसिलदार, तहसिल कार्यालय, कर्जत, जि. रायगड यांना माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी.
४. ग्रामपंचायत, हालीवली, किरवली यांना माहितीसाठी व योग्य प्रसिध्दीसाठी अग्रेषित.
५. विद्यापीठ संकेतस्थळ, डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली. जि. रत्नागिरी.

# विभागात करावयाच्या कामाची यादी सन २०२३– २४

(०१.१०.२०२३ ते ३१.०३.२०२४)

| | |
|---|---|
| | |
| १. | सन २०२३–२४हंगामातील आंबा कलमे शेडच्या बाहेर काढणे. |
| २. | फुटलेली व न फुटलेली आंबा कालमे वेगळे करून व्यवस्थित ओळीत लावणे. |
| ३. | बुरशीनाशकाची व किटकनाशकांची अळवणी व फवारणी करणे. |
| ४. | मातृवृक्षबागेला खते देणे. |
| ५. | मातृवृक्षबागेतील तणांची काढणी करणे. |
| ६. | मातृवृक्ष बागेच्या रोपात असणा झुडंपाची छाटणी तयार. |
| ७. | आंबा, जांभुळ व चिकु याचे शेंडा कलम बांधणे. |
| ८. | तुळस रोपे तयार करण्यासाठी गादीवाफे तयार करणे |
| ९. | तुळस रोपे ४X६ बॅग भरणे व पिशव्यात लावणे. |
| १०. | काळीमिरी कलमे करण्याकरीता माती वाहतूक करणे. |
| ११. | माती व शेणखताचे मिश्रण तयार करून पिशव्या भरणे. |
| १२. | भरलेल्या पिशव्या वाहतूक करून शेडमध्ये ओळीत लावणे. |
| १३. | काळीमिरी कटींग चांगल्या फुटव्याकरीता शेड तयार करणे. |
| १४. | शेड तयार करण्यासाठी बांबू तोडणे, बांबू बांधणे व प्लॅस्टीक बांधणे ई. कामे करणे. |
| १५. | काळीमिरी कटींग (Cutting) तयार करणे. |
| १६. | काळीमिरी मातृवृक्षांचे आणि काळीमिरी कलमांचे (पिशव्यातील) व्यवस्थापन करणे. |
| १७. | नर्सरीमधील तण काढणे, पाणी देणे व परीसर स्वच्छ ठेवणे. |
| १८. | फुटलेल्या काळीमिरी व न फुटलेली काळीमिरी वेगवेगळी करून व्यवस्थीत ओळीमध्ये लावणे. |
| १९. | मोगरा कटींग लावण्यासाठी माती वहातुक करणे. माती व शेणखताचे मिश्रण तयार करून पिशव्या भरणे. |
| २०. | भरलेल्या पिशव्या वाहतूक करून शेडमध्ये ओळीत लावणे. |
| २१. | मोगरा झाडांवर किटकनाशके/बुरशीनाशकांची फवारणी करणे. |
| २२. | नविन कुंपण करणे. |
| २३. | ऐनवेळी उद्यानविद्या विभागात सांगितलेली कामे करणे |

## कंत्राटी कामाच्या शर्ती व अटी खालील प्रमाणे

१. उद्यानविद्या विभागातील अधिकारी व कर्मचारी यांच्या सुचनेप्रमाणे प्रक्षेत्रावरील कामे करावयाची आहेत.

२. प्रक्षेत्रावर शेतीची कामे करतांना विद्यापीठ परिपत्रक क्रमांक डॉबासाकोकृवि/आस्था/ व-६/६२८७/२०१७ दि.२५.०७.२०१७ व परिपत्रक क्रमांक डॉबासाकोकृवि/आस्था/ व-५/३३६६/२०२३ दि.२५.०८.२०२३ अन्वये कंत्राटी मजुरांना द्यावयाच्या सर्व सोयी सुविधा बाबतची जबाबदारी ठेका घेणाऱ्याची राहील व त्यांना सोयी सुविधा पुरविण्याबाबतचे प्रमाणपत्र देयकासोबत सादर करणे बंधनकारक राहील.

३. शासनाने निर्गमीत केलेले आयकर व तत्समकर बिला मधून परस्पर वजा केले जातील.

४. ठेकेदाराच्या कामगाराची कामाची वेळ सकाळी ८.०० ते १२.३० व दुपारी २.०० ते ५.३० अशी राहील. सकाळचे किंवा दुपारचे सत्रात कामगार गैरहजर राहील्यास अर्धा युनिट काम केले आहे असे समजण्यात येईल व त्यानुसार रक्कम देय राहील.

५. प्रत्येक पंधरवाडयात किती युनीटची आवश्यकता आहे याची माहिती ज्या त्या वेळी देण्यात येईल.

६. ठेकेदाराने कंत्राटी कामाचे बिल प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला सादर करावयाचे आहे. बिल उशिरा सादर केल्यास त्याप्रमाणे विलंब होईल.

७. प्रक्षेत्रावरील प्रयोगाची कामे व त्या अनुषंगाने येणारी कामे वेळच्यावेळी पुर्ण करण्याची जबाबदारी संबंधीत ठेकेदाराची राहील.

८. वरील ठेका माहे ०१.१०.२०२३ ते ३१.०३.२०२४ करीता असेल.

९. काम समाधानकारक न आढळल्यास अथवा कामामध्ये प्रत्यक्ष अप्रत्यक्ष व्यत्यय आणल्यास ठेका रद्द करण्यात येईल.

१०. सदर कामे ही निव्वळ कंत्राटी पध्दतीने करावयाची असल्याने कोणत्याही व्यक्तीस विद्यापीठाच्या सेवेत घेण्याबाबतचा हक्क असणार नाही.

वरील शर्ती व अटी एकतर्फी नसून मला त्या मान्य आहेत.

सही : ..........................................

नाव : ......................................

**प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील उद्यानविद्या विभागांतर्गत ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक**

प्रति,

मा. सहयोगी संशोधन संचालक,
प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र,
कर्जत, जि. रायगड

**विषयः** प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील उद्यानविद्या विभाग येथे कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक.

**संदर्भ** : जा.क्र.ससंसं/उद्यान/कं.म./ /२०२३, दिनांक :

वरील संदर्भित जाहीर प्रसिध्दी पत्रान्वये प्रादेशिक कृषि संशोधन केंद्र, कर्जत येथील उद्यानविद्या विभाग येथे कामे ठेका पध्दतीने करावयाच्या कामाचे दरपत्रक खालील प्रमाणे.

| **कामाचे तपशिल** | २०२३–२४ या वर्षासाठी ( ०१.१०.२०२३ ते ३१.०३.२०२४) |
|---|---|
| सोबतच्या यादीमध्ये नमुद केलेल्या कामासाठीचे दरपत्रक | एकूण रुपये ......................<br>अक्षरी ............................................................... |

मला सर्व अटी व शर्ती मान्य आहेत तरी माझे दरपत्रक मंजूर करावे ही विनंती.

सही : ..............................................

नांव : ..............................................

पत्ता : ..........................................